# जिल्हास्तरीय अल्पसंख्यांक कल्याण समिती

अल्पसंख्यांक कार्य मंत्रालय, भारत सरकार यांच्या सुधारीत र्मादर्शक सूचनांनुसार मा.पंतप्रधान यांच्या १५ कलमी कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी तसेच राज्यातील अल्पसंख्यांक समाजाच्या सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक उन्नतीसाठी तसेच स्थानिक अल्पसंख्याकांच्या समस्या तातडीने सोडविण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या जिल्हा अल्पसंख्यांक कल्याण समित्या बरखास्त करण्याचा तसेच नव्याने जिल्हास्तरीय अल्पसंख्यांक कल्याण समित्या गठीत करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असल्याचे कळविण्यात आले होते.

त्या अनुषंगाने अल्पसंख्याकांच्या कल्याणाकरिता मा.पंतप्रधान यांच्या १५ कलमी कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी अल्पसंख्यांक विकास विभाग, क्र.अविवि-२०१५/प्र.क्र.२४०/कार्या-९ दिनांक १५ एप्रिल, २०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये देण्यात आलेल्या निर्देशानुसार जिल्हास्तरीय अल्पसंख्यांक कल्याण समितीच्या रचनेतील (इ) येथील तरतूदीनूसार "स्थानिक पंचायत राज संस्थांचे प्रतिनीधी" त्याचप्रमाणे संरचनेतील (ई) येथील तरतूदीनूसार जिल्हाधिकारी यांनी जिल्हयातील अल्पसंख्याकांसाठी काम करणा-या ३ नामवंत संस्थांचे प्रतिनीधी यांची नियुक्ती करण्यासाठी अर्ज / प्रस्ताव मागण्यात येऊन सदर प्राप्त अर्ज / प्रस्ताव यांची छाननी करुन योग्य व पात्र असणा-या ३ मान्यवर संस्थेच्या प्रत्येकी १ प्रमाणे एकूण ३ सदस्यांच्या प्रतिनीधींच्या नावे जिल्हाधिकारी यांनी शासनास सादर करावी असे सूचित करण्यात आले होते.

**त्यानूसार उपरोक्त दोन्ही संवर्गातील / गटातील नियुक्त्यांसाठी जिल्हाधिकारी यांच्याकडून प्राप्त प्रस्ताव तसेच शासनस्तरावर प्राप्त झालेल्या अन्य शिफारसी विचारात घेवून सदर दोन्ही दोन्ही संवर्गातील / गटातील सदस्यांच्या नियुक्त्या शासन स्तरावरुन करण्यात येणार असल्याचेही शासन निर्णयाव्दारे निर्देशित करण्यात आले आहे.**

अल्पसंख्याकांच्या कल्याणाकरिता मा.पंतप्रधान यांच्या १५ कलमी कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी दिनांक २९ एप्रिल, २०११ रोजीच्या शासन निर्णयान्वये गठीत करण्यात आलेल्या "जिल्हा अल्पसंख्याक कल्याण समिती" च्या रचनेमध्ये अल्पसंख्यांक कार्य मंत्रालय यांच्या सुचनांनुसार यापूर्वीची "जिल्हास्तरीय विकास सनियंत्रण समिती" बरखास्त करण्यात आली असून त्याऐवजी खालीलप्रमाणे "जिल्हास्तरीय अल्पसंख्यांक कल्याण समिती" स्थापन करण्यास संदर्भिय शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत असल्याचे कळविण्यात आले आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| अ) | जिल्हाधिकारी/उपायुक्त | - | अध्यक्ष |
| आ) | जिल्हास्तरीय अल्पसंख्यांक कल्याणाशी संबधित इतर अधिकारी | - | सदस्य |
| इ) | स्थानिक पंचायत राज संस्थांचे प्रतिनीधी (संख्या निश्चित नाही तथापि प्रामुख्याने ग्रामीण तसेच नागरी क्षेत्रातील अल्पसंख्यांक कल्याणाशी संबधित) | – | सदस्य |
| ई) | जिल्हयातील अल्पसंख्याकांसाठी काम करणा-या ३ नामवंत अशासकीय स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनीधी | - | सदस्य |
| उ) | जिल्हयातील सर्व लोकसभा सदस्य | - | सदस्य |
| ए) | जिल्हयातील सर्व विधानसभा सदस्य | - | सदस्य |
| ऐ) | राज्यातील प्रत्येक जिल्ह्याकरिता केंद्र शासनाने नामनिर्देशित केलेले एक राज्यसभा सदस्य | - | सदस्य |

सदर प्रकरणी शासन निर्णयामध्ये नमूद केल्याप्रमाणे परभणी जिल्ह्याकरिता “जिल्हास्तरीय अल्पसंख्यांक कल्याण समिती” गठीत करण्यासाठी आयोजित करावयाच्या बैठकीपूर्वी शासन निर्णयामध्ये दिलेल्या सूचनानूसार सदस्य म्हणून निवड करावयासाठी स्थानिक पंचायत राज संस्थांच्या योग्य प्रतिनीधींचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांचेमार्फत या कार्यालयास प्राप्त नाव / प्रस्ताव (प्रामुख्याने ग्रामीण क्षेत्रातील अल्पसंख्यांक कल्याणाशी संबधित) तसेच जिल्हास्तरीय अल्पसंख्यांक कल्याण समितीमध्ये सदस्य म्हणून निवड करावयासाठी नागरी क्षेत्रातील अल्पसंख्यांक कल्याणाशी संबधित एका स्थानिक पंचायत राज संस्थेच्या प्रतिनीधीचे आयुक्त, परभणी शहर महानगरपालिका, परभणी तसेच जिल्हा प्रशासन अधिकारी, नगर विकास शाखा, परभणी यांचेमार्फत प्राप्त नाव / प्रस्ताव या कार्यालयामार्फत शासनास सादर करण्यात आले आहे.

त्याचप्रमाणे शासन निर्णयातील संरचनेतील (ई) येथील तरतूदीनूसार अल्पसंख्यांक कल्याण समितीमध्ये सदस्य म्हणून निवड करावयासाठी परभणी जिल्हयातील अल्पसंख्याकांसाठी काम करणा-या ३ नामवंत संस्थांचे प्रतिनीधी यांची सदस्य म्हणून नियुक्ती करण्यासाठी जिल्हास्तरावर अर्ज / प्रस्ताव मागविणेकरिता या कार्यालयामार्फत कळविण्यात आल्यानूसार माहिती व जनसंपर्क संचलनालय, औरंगाबाद यांचेकडून स्थानिक वृत्तपत्रातून दि.१३ मे, २०१७ रोजीच्या प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरातीच्या अनुषंगाने परभणी जिल्हयातील अल्पसंख्याकांसाठी काम करणा-या अक्सा फाऊंडेशन, काद्राबाद प्लॉट, टॉप फेब्रीकेटर्स समारे, परभणी यांचा अल्पसंख्यांक कल्याण समितीमध्ये सदस्य म्हणून निवड करणेबाबतचा पात्र प्रस्ताव या कार्यालयामार्फत शासनास सादर करण्यात आला आहे.

त्या अनुषंगाने अल्पसंख्याकांच्या कल्याणाकरिता मा.पंतप्रधान यांच्या १५ कलमी कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी अल्पसंख्यांक विकास विभाग, क्र.अविवि-२०१५/प्र.क्र.२४०/कार्या-९ दिनांक १५ एप्रिल, २०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये देण्यात आलेल्या निर्देशानुसार उपरोक्त दोन्ही संवर्गातील / गटातील नियुक्त्यांसाठी जिल्हाधिकारी यांच्याकडून प्राप्त शिफारसी तसेच शासनस्तरावर प्राप्त झालेल्या अन्य शिफारसी विचारात घेवून सदर दोन्ही दोन्ही संवर्गातील / गटातील सदस्यांच्या नियुक्त्या शासन स्तरावरुन करण्यात आल्यानंतर परभणी जिल्ह्याकरिता गठीत करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय अल्पसंख्यांक कल्याण समितीमार्फत शासन निर्णायामध्ये नमूद समितीच्या कार्यानूसार कार्यवाही करण्यात येईल.

याबाबतचे अधिक माहितीसाठी सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७०४१८१६५१५४४४१४ असा आहे.